| | | |
|---|---|---|
| | जनसंपर्क अधिकारी<br>मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय<br>रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे- ४०११०७<br>Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in | |


प्रेसनोट ३६८ - २३ दिनांक : - २१/१०/२०२३

## मंदिरामध्ये चोरी करणाऱ्या आरोपीतास अटक करुन ४ गुन्हांची उकल
## वसई पोलीस ठाणे गुन्हे प्रकटीकरण पथकाची कामगिरी

वसई पोलीस ठाणे हद्दित दि.०८/१०/२०२३ रोजी रात्री ०२.०० वाजेचे सुमारास गिरीज तलाव येथील हनुमान मंदिराच्या लाकडी दरवाज्याचा कडी कोंडा तोडुन मंदिराच्या गाभाऱ्यात प्रवेश करुन गाभाऱ्यातील दानपेटीचा कडी कोंडा तोडुन दान पेटीतील अंदाजे ४५००/- रुपये चोरी झालेबाबत वसई पोलीस ठाणे येथे दि. ०८/१०/२०२३ रोजी गुन्हा रजि.नं. ३२८/२०२३ भा.द.वि.सं.कलम ४५७,३८० प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला.

वसई पोलीस ठाणे हद्दिमध्ये मागील काही दिवसामध्ये घरफोडी व चोरीच्या गुन्हयामधील वाढत्या प्रमाणामुळे मा.वरिष्ठ पोलीस निरीक्षक सो,व पोलीस निरीक्षक गुन्हे यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे प्रकटीकरण शाखेतील अधिकारी व अंमलदार यांचे दोन पथके तयार केली.

सदर मंदीरातील तसेच घटनास्थळाचे आसपासचे सीसीटिव्ही चेक केले असता एक इसम हा स्वतःच्या तोंडाला कपडयाच्या सहाय्याने बांधुन डोक्यावर टोपी घालुन आपली ओळख लपवुन चोरी करण्याकरीता आला असल्याचे दिसुन आले. तसेच मंदीराबाहेरील सीसीटिव्ही चेक केला असता सदर इसम हा एका रिक्षामध्ये बसुन जात असल्याचे दिसुन आले. सदर रिक्षाबाबात आम्ही चौकशी केली असता सदर रिक्षा ही वालीव येथुन चोरी झाल्याचे आम्हाला समजले व सदर बाबत वालीव पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल केल्या बाबत समजले.

त्यावेळी आम्ही गुन्हे प्रकटीकरण शाखेच्या दोन टिम तयार करुन एक टिम घटनास्थळ ठिकाणी व दुसरी टिम रिक्षा चोरीच्या घटनास्थळी वालीव येथे जावुन सीसीटिव्ही च्या आधारे व तांत्रिक विश्लेषणाच्या आधारे सदर गुन्हातील आरोपीत याचे नाव निष्पन्न करुन आरोपी **शाबीर ऊर्फ फतेह मुर्तजाअली शेख वय २६ वर्षे रा. रुम नं ३,शुक्ला चाळ, शंकर किराणा शॉप च्या समोर,धानिवबाग,नालासोपारा पुर्व** यास धानिवबाग येथुन सापळा रचुन ताब्यात घेतले. सदर आरोपीत याचेकडे चौकशी केली असता सदर गुन्हातील त्याचा सहभाग निष्पन्न झाल्याने सदर गुन्हात त्यास अटक करण्यात आली आहे. त्याचेकडे अधिक तपास केला असता सदर आरोपीने गुन्हयात वापरेलेली रिक्षा वालीव पोलीस ठाणे हद्दीतुन चोरली असुन त्याने वसई व माणिकपुर हद्दीमध्ये मंदीर व चर्चमध्ये अशाच प्रकारे दानपेटीतुन पैसे चोरी केल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे.

**-उघडकीस आलेले गुन्हे-**

| अं.क्र. | पोलीस ठाणे | गुन्हा रजि.नं.व कलम |
|---|---|---|
| १) | वसई | ३२८/२०२३ भा.द.वि.सं.कलम ३८०,४५७ प्रमाणे (मुळ गुन्हा ) |
| २) | वसई | ३३३/२०२३ भा.द.वि.सं.कलम ३८०,४५७ प्रमाणे |
| ३) | वालीव | ८०२/२०२३ भा.द.वि.सं.कलम ३७९ प्रमाणे |
| ४) | माणिकपूर | ३८८/२०२३ भा.द.वि.सं.कलम ३८०,४५७,४५४ प्रमाणे |

वरीलप्रमाणे गुन्हयामध्ये आरोपीत याचेकडुन ५०,०००/- रुपये किंमतीची रिक्षा तसेच मंदीर व चर्च मधुन चोरी केलेली ४०९६/- रुपये किंमतीची रोख्र रक्कम हस्तगत करण्यात आली आहे.

सदरची कामगिरी मा.श्री.पौणिमा चौगुली-श्रींगी, पोलीस उप-आयुक्त, परिमंडळ - २ वसई, मा. श्रीमती. पद्‌मजा बढे, सहा.पोलीस आयुक्त, वसई विभाग, यांचे मार्गदर्शनाखाली श्री. रणजित आंधळे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, वसई पोलीस ठाणे, श्री. अब्दुलहक देसाई पोलीस निरिक्षक (गुन्हे), गुन्हे प्रकटीकरण पथकाचे स.पो.नि.सुनिल पवार, पो.हवा. सुनिल मलावकर, मिलींद घरत, पो.अं. सुर्यकांत मुंढे, अक्षय नांदगावकर, सौरभ दराडे, प्रशांत आहेर यांनी केलेली आहे.